# जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन
# निर्मल भारत अभियान
# जिल्हा परिषद, बुलडाणा

**विभागाची प्रस्तावना :**

संपूर्ण स्वच्छता अभियानाची बुलडाणा जिल्ह्यात सन २००३-०४ पासुन झाली. सर्वप्रथम जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींचे बेसलाईन सर्व्हेक्षण करण्यात येऊन जिल्ह्याची स्वच्छतेची सद्यस्थितीबाबत सर्व माहितीचे संकलन करण्यात आले. जिल्ह्यात त्यावेळेस स्वच्छतेची व्याप्ती ही केवळ ११ % इतकीच होती. जिल्ह्यात ग्रामीण भागातील एकुण कुटुंब संख्या ही ३,७८,२५४ इतकी होती त्यामध्ये दारीद्र्य रेषेखालील १,३६,७०० तर दारीद्र्य रेषेवरील २,४१,५५४ कुटुबांचा समावेश होता. सर्व्हेक्षणातून प्रत्यक्ष माहितीतुन जिल्ह्यात त्यावेळेस दारीद्र्य रेषेखालील १,१७,२७५ व दारीद्र्य रेषेवरील २,०८,५१२ अशा एकुण ३,२५,७८७ कुटुबांकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध नव्हती.

संपूर्ण स्वच्छा अभियानाची व्यापक अंमलबजावणी करणेचेदृष्टीने तालुकानिहाय कक्ष स्थापन करण्यात येऊन जिल्हाकक्ष व तालुका कक्ष यांच्या माध्यमातून ग्रामपंचायतींना प्रत्यक्ष भेटी देऊन ग्रामसभेच्या माध्यमातून लोकांना स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याचे काम वेगाने सुरु झाले. गावा-गावात शौचालय बांधकाम, परिसर स्वच्छतेचे काम जोरात सुरु झाले. त्याचे फलित म्हणजे सन २००५-०७ मध्ये जिल्ह्यातून एकुण २८ ग्रामपंचायतीनी केंद्र शासनाचा सर्वोच्च असा निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त केला. व हीच परंपरा पुढे कायम राखत सन २००७-०८ मध्ये २० ग्रामपंचायती, सन २००८-०९ मध्ये ११ ग्रामपंचायतीं, सन २००९-१० मध्ये २, सन २०१०-११ मध्ये ३ ग्रामपंचायती अशा जिल्ह्यातील एकुण ६४ ग्रामपंचायतींनी निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त केलेला आहे.

जिल्ह्यात स्वच्छता अभियानाची व्यापक अंमलबजावणी करतांना माहिती, शिक्षण व संवाद (प्रचार प्रसिध्दी) हा घटक अतिशय महत्वाचा ठरला. त्याअंतर्गत जिल्ह्यात ग्रामपंचायतींना प्रत्यक्ष भेटी, विशेष सभा, गृह भेटी, कुटुंब संपर्क अभियान, रोगराईमुक्त पावसाळा, स्वच्छता महाअभियान, स्वच्छता दूत, सरपंच, सदस्य, तालुकानिहाय कर्मचारी यांचे प्रशिक्षण वर्ग आदी विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात आले.

**शालेय व अंगणवाडी स्वच्छता गृह :** जिल्ह्यात अभियान सुरु झाल्यापासुन शाळा व अंगणवाडी या विषयावर प्रामुख्याने लक्ष केंद्रीत करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांना आतापासूनच स्वच्छतेच्या सवयी लागाव्या या अनुषंगाने प्रत्येक शाळेत व प्रत्येक अंगणवाडीत मुलां-मुलींसाठी स्वतंत्रपणे स्वच्छता गृह व मुता-यांची व्यवस्था निर्माण करण्यात आलेली आहे. प्रत्येक शाळेत स्वच्छता दूत ही संकल्पना राबविण्यात आलेली आहे.

**संपूर्ण स्वच्छता अभियान ते निर्मल भारत अभियान :**

जिल्ह्यात संपूर्ण स्वच्छता अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरु असतानांच १ नोव्हेंबर २०१२ पासून जिल्हा स्वच्छता मिशन कक्षाची स्थापना करण्यात आली. त्याअंतर्गत निर्मल भारत अभियान, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, पाणी गुणवत्ता या शाखांचा समावेश करण्यात आला आहे. संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या स्वरुपात बदल करण्यात येऊन त्याचे नामांतरण निर्मल भारत अभियान असे करण्यात आले. अभियानाच्या बदलामध्ये वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम व वापर करणा-या दारीद्र्य रेषेखालील (B.P.L.) च्या सर्व कुटुबांना, तर दारीद्र्य रेषेवरील (A.P.L.) च्या एस. सी., एस.टी., महिला कुटुंब प्रमुख, अपंग कुटुंब प्रमुख, लहान आणि अल्पभुधारक शेतकरी, भुमिहीन शेतमजुर या सर्व कुटुबांनी शौचालय बांधकाम करुन वापर केल्यास निर्मल भारत अभियानातून रु. ४६००/-, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून रु. ४५००/- असे प्रोत्सानपर बक्षिस देता येणार आहे. त्यामुळे निश्चितच ग्रामीण भागातील कुटुबांना शौचालय बांधकामासाठी मोठे आर्थिक पाठबळ मिळणार आहे. याआधी संपूर्ण स्वच्छता अभियानातंर्गत शौचालय बांधकाम प्रोत्साहनपर बक्षिस रु. ३२००/- हे फक्त दारीद्र्य रेषेखालील (B.P.L.) च्याच कुटुबांना देण्यात येत होते.

निर्मल भारत अभियानानुसारचे उद्दीष्ट :

निर्मल भारत अभियानाची सुरुवात करण्यापुर्वी जिल्ह्यात सन २०१२ मध्ये सर्व ग्रामपंचायतींचा बेसलाईन सर्व्हे करण्यात आला. त्यानुसार संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या आकडेवारीनुसार बेसलाईन सर्व्हेमधील माहितीत बराच बदल झालेला आढळुन आला. त्यानुसार नवीन आकडेवारी प्रमाणे जिल्ह्यात शौचालय असलेले दारीद्र्य रेषेखालील (BPL) कुटुंब ५९,७२१ तर शौचालय नसलेले कुटुंब ९७,१८४ तर दारीद्र्य रेषेवरील (APL) कुटुंबामध्ये ९७,३८५ असलेले, शौचालय नसलेले १,६६,९९३ कुटुंबांकडे अजुनही शौचालयाची सुविधा नाही. म्हणजेच जिल्ह्यात एकुण ४,२१,२८३ कुटुंबापैकी १,५७,१०६ कुटुंबाकडे शौचालयाची सुविधा असून २,६४,१७७ कुटुंबाकडे अद्याप शौचालयाची सुविधा नाही.

**विभागाची रचना :**

**जिल्हा संवाद धोरण आराखडा निर्मिती प्रक्रीयेतील सहभागी :**

**अधिकारी व वैयक्तीक सल्लागार :**

| अ.क्रं. | अधिका-याचे नाव | पद | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री. ओमप्रकाश देशमुख | मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद, बुलडाणा | ९८५०८३५६७८ |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | मा. प्रमोदकुमार पवार | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) | ९९६०९८३६९० |
| ३. | मा. श्री. दिपक वाघ | कार्यकारी अभियंता<br>ग्रामीण पाणी पुरवठा | ९४२१७७१५२८ |

कार्यालय दूरध्वनी क्रमांक : ०७२६२-२४५८२० Emali ID : nbazpbuldana@gmail.com

## प्रकरण १.    जिल्हास्तरावरील कार्यक्रम व्यवस्थापनासाठी संस्थात्मक व्यवस्था:

**जिल्हा पाणी व स्वच्छता विभाग संरचना :**   १ ऑक्टोबर २०१२ पासून शासनाच्या सुचनेनूसार पाणी व स्वच्छता मिशन कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. कार्यक्रमाच्या व्यवस्थापनासाठी या मिशन अंतर्गत खालील प्रमाणे संस्थात्मक संरचना करण्यात आलेली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी

↓

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)

↓

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष

| *स्वच्छता कक्ष* | *पाणी गुणवत्ता कक्ष* | *माहिती, शिक्षण व संवाद* | *मनुष्यबळ विकास कक्ष* | *संनियंत्रण व मुल्यमापन कक्ष* | *लेखा शाखा* | *आस्थापना शाखा* |
|---|---|---|---|---|---|---|
| **समाजशास्त्रज्ञ** (समीर बेग) | **पाणी गुणवत्ता तज्ञ** कु. किरण शेजोळे | **माहिती शिक्षण व संवाद तज्ञ** संदीप पाटील | **क्षमता बांधणी तज्ञ** (संतोष साखरे) | **संनियत्रण व मुल्यमापन तज्ञ** (रिक्त) | **वित्त नि संपादणूक सल्लागार** (ज्ञानेश्वर वाकोडे) | **डेटा एट्री ऑपरेटर** (सचिन जाधव) |
| **स्वच्छता तज्ञ** (निरज ठोसर) | **जल निरिक्षक** (रिक्त) | **माहिती शिक्षण व संवाद सल्लागार (संदीप सुखधान )** | **मनुष्यबळ विकास सल्लागार** (मनिषा शेजव) | **संनियत्रण व मुल्यमापन सल्लागार** (प्रणिता अंभोरे) | **लेखाधिकारी** डी. एम. किनगे | **शिपाई** (रिक्त) |
| शालेय स्वच्छता व आरोग्य सल्लागार (जी.एस.घाईट) | | | | | | |

**कक्षाची भूमिका अणि जबाबदाऱ्या:**

1 ऑक्टोंबर 2012 च्या शासन निर्णयात सुचविल्यानुसार निर्मल भारत अभियान व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत जबाबदा-या सोपविण्यात आल्या आहेत.

**पंचायत समिती स्तर सरंचना :** पंचायत समितीस्तरावर कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीची जबाबदारी तालूका साधन केंद्राची असून गट विकास अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली व तालूकास्तरीय कार्यक्रमाधिकारी व गटसमन्वयक (निभाअ) यांचे विशेष सहकार्याने तालूकास्तरीय यंत्रणा कार्यान्वीत आहे.

## ग्राम पंचायतस्तरावरील सरंचना:




**ग्राम पंचायतस्तरावरील संस्थात्मक रचना :-**

प्रत्येक ग्रामपंचायतीच्या अंतर्गत ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती (VWSC) ही ग्रामपंचायतीची उपसमिती असून

**निर्मल भारत अभियान योजनेचे वैशिष्टय :**

निर्मल ग्राम पुरस्काराच्या यशाने प्रोत्साहीत होऊन संपूर्ण स्वच्छता अभियानाचे नामांतर निर्मल भारत अभियानात करण्यात आले. सुधारीत धोरण आणि पर्याप्तेच्या माध्यमातुन ग्रामीण समाजाला पूर्णपणे सामावून घेण्यासाठी स्वच्छतेच्या व्याप्तीचा वेग अधिक वाढविणे हे या अभियानाचे मुख्य उद्दीष्ट आहे. निर्मल भारत अभियानाच्या संकल्पनेत ग्रामपंचायतीला अभियानाचा केंद्रबिंदू समजून संपूर्ण ग्रामपंचायत क्षेत्र निर्मल होण्याच्या दृष्टीने सर्व समाजाला स्वच्छतेच्या पूर्ण सुविधा देणे अभिप्रेत आहे. या दृष्टीने ग्रामपंचायत स्तरासाठी अभियानाचे पुढीलप्रमाणे प्राधान्यक्रम असतील.

- ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात दारीद्र्य रेषेखालील आणि निवडक दारीद्र्य रेषेवरील अशा सर्व कुटुंबासाठी वैयक्तीक शौचालयाची सोय करुन देणे.
- सर्व वाड्या-वस्त्यांना पिण्याच्या पाण्याची उपलब्धता असणा-या ग्रामपंचायती आणि त्यातही प्राधान्याने पाईपद्वारे पाणी पुरवठा असणा-या ग्रामपंचायती.
- शासकीय इमारतीत असणा-या शासकीय शाळा, अंगणवाड्या यामध्ये स्वच्छता साधन सुविधांची सोय असणा-या ग्रामपंचायती.
- निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त आणि प्रस्तावित ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन.
- चिरस्थायी स्वच्छतेच्या शाश्वतीसाठी पंचायत राज संस्था, ग्राम पाणी व स्वच्छता समिती, गावपातळीवरील कार्यकर्ते यांच्यासाठी क्षमता बांधणी कार्यक्रम.
- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत अकुशल आणि कुशल मनुष्य दिवस यांची योग्य सांगड.

**निर्मल भारत अभियानाची उद्दीष्टे :**

- ग्रामीण क्षेत्रातील सर्वसाधारण जीवनमानात सुधारण घडवून आणणे.
- ग्रामीण भागातील स्वच्छतेच्या व्याप्तीची गती वाढवून 2022 पर्यंत देशातील सर्व ग्रामपंचायतींना निर्मल दर्जा मिळवून देवून निर्मल भारताचे स्वप्न पुर्ण करणे.
- शाश्वत स्वच्छतेच्या साधनांचा प्रसार करणा-या पंचायत राज संस्था आणि सामाजिक गटांना जाणिव जागृती व आरोग्य शिक्षण याद्वारे प्रेरित करणे.
- सर्व शिक्षा अभियानांतर्गत (SSA) येत नसलेल्या शाळा व अंगणवाड्यांना सुयोग्य स्वच्छता सोयी पुरविणे आणि विद्यार्थ्यांना आरोग्यशास्त्र शिक्षण आणि स्वच्छतेच्या सवयी याबद्दल माहिती देणे.
- पर्यावरणाच्या दृष्टीने सुरक्षित, कायम स्वरुपी स्वच्छतेसाठी स्वस्त आणि योग्य तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देणे.
- ग्रामीण भागात सार्वत्रिक स्वच्छता राखण्यासाठी लोकांचे व्यवस्थापन असलेल्या आणि घनकचरा व सांडपाण्याच्या विल्हेवाटीला प्राधान्य देणा-या पर्यावरणानुकुल स्वच्छतेच्या पध्दती विकसित करणे.

**निर्मल भारत अभियानाशी संबधी वेबसाईट :**

www.ddws.gov.in

www.nba.gov.in

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नियुक्ती जनमाहीती अधिकारी, अपीलीय अधिकारी :**

**कार्यालयाचे नाव : जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष**

| **कार्यालयाचे नाव** | **अपिलिय अधिका-याचे पदनाम, दूरध्वनी क्रमांक व पत्ता** | **शासकिय माहिती अधिकारी यांचे पदनाम, दूरध्वनी क्रमांक व पत्ता** | **सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी यांचे पदनाम, दूरध्वनी क्रमांक व पत्ता** |
|---|---|---|---|
| जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद, बुलडाणा दूरध्वनी : ०७२६२-२४२३९६ | जिल्हा सहाय्यक समन्वयक, दूरध्वनी : ०७२६२-२४५८२० | सनियंत्रण व एम.आय.एस. सल्लागार दूरध्वनी : ०७२६२-२४५८२० |

जिल्हा पाणी स्वच्छता मिशन कक्षाशी संबधीत अधिकारी कर्मचारी यांचे दुरध्वनी क्रमांक तसेच ई-मेल आय.डी.

| जिल्हास्तरीय अधिकारी / जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन यांचे संपर्क स्त्रोत | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| जिल्हा: बुलडाणा | | | | | |
| अ. क्र. | संपूर्ण नाव | पदनाम | कार्यालय दुरध्वनी क्र. (STD कोडसह) | भ्रमणध्वनी क्र. | ई-मेल पत्ता |
| 1 | श्री. ओमप्रकाश देशमुख | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा | ०७२६२-२४२३०९ | ९८५०८३५६७८ | ceozpbuldana@gmail.com ,odeshmukh@hotmail.com |
| 2 | मा. प्रमोदकुमार पवार | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) | ०७२६२२४२३९६ | ९९६०९८३६९० | nbazpbuldana@gmail.com |
| 3 | श्री दिपक वाघ | कार्यकारी अभियंता (ग्रापापु), जि.प. बुलडाणा | ०७२६२-२४३६७३ | ९४२१७७१५२८ | eebnbuldana@gmail.com |
| 4 | जी.एस. घाईट | शालेय स्वच्छता व आरोग्य सल्लागार (नि.भा.अ.) | ०७२६२२४५८२० | ९४२३१४४७५८ | gajananghait@rediffmail.com |
| 5 | समीर आय. बेग | समाज विकास सल्लागार (नि.भा.अ.) | ०७२६२२४५८२० | ९४२३१४४०८० | sameermrz@gmail.com |
| 6 | संदीप एम. पाटील | माहिती शिक्षण संवाद सल्लागार (नि.भा.अ.) | ०७२६२२४५८२० | ९४२२१८४७४० | sundeep.patil1@gmail.com |
| 7 | संतोष बी साखरे | समुदाय विकास व क्षमता बांधणी तज्ञ (नि.भा.अ.) | ०७२६२२४५८२० | ९०२८४१८६१३ | santoshsbs.2009@rediffmail.com |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8 | निरजकुमार प्रकाश ठोसर | स्वच्छता तज्ञ (नि.भा.अ.) | ०७२६२२४५८२० | ९४२२९२७२२२ | nbazpbuldana@gmail.com |
| 9 | मनिषा शेजव | माुष्यबळ विकास सल्लागार(एनआरडीडब्ल्यूपी) | ०७२६२२४५८२० | ९८६०५५१५०४ | hrdbuldana@gmail.com |
| 10 | प्रणिता अंभोरे | मुल्यमापन व संियंत्रण सल्लागार (एआरडीडब्ल्यूपी) | ०७२६२२४५८२० | ९८६०५२०४५१ | nbazpbuldana@gmail.com |
| 11 | संदिप सुखधान | माहिती शिक्षण संवाद सल्लागार (एआरडीडब्ल्यूपी) | ०७२६२२४५८२० | ९६८९६५८६८१ | sandipsukhdhan@gmail.com |
| 12 | ज्ञानेश्वर वाकोडे | वित्त व संपादूणूक सल्लागार (एआरडीडब्ल्यूपी) | ०७२६२२४५८२० | ९६८९४८१५८२ | dnyaneshwar21385@gmail.com |
| 13 | किरण शेजोळे | पाणी गुणवत्ता सल्लागार (पाणी गुणवत्ता) | ०७२६२२४५८२० | ८१७७८९७३२८ | waterquality.buldana@gmail.com |

# गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांचे संपर्क स्त्रोत

## जिल्हा: बुलडाणा

| अ. क्र. | तालुका / पंचायत समिती | गटविकास अधिकारी यांचे संपूर्ण नाव | कार्यालय दुरध्वनी क्र. (STD कोडसह) | भ्रमणध्वाी क्र. | ई-मेल पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| 1 | बुलडाणा | श्री. व्ही. बी. राजपूत | ०७२६२-२४२३७१ | ९४२२१८३५४५ | eopbuldhana@gmail.com |
| 2 | चिखली | श्री. सी.एच.राजपुत | ०७२६४-२४२०५४ | ९४२०१४७३७३ | eopchikhli@gmail.com |
| 3 | दे. राजा | कु. क्रांती बोराटे | ०७२६१-२३२०१८ | ८५५१८१०८३७ | eopdeulgaonraja@gmail.com |
| 4 | सिं. राजा | श्री. सी. बी. चेके | ०७२६९-२३४२३२ | ९४२०१००६२९ | eopsindkhedraja@gmail.com |
| 5 | लोणार | श्री. डी. डब्ल्यू. चव्हाण | ०७२६०-२२१३३२ | ९४२३२३८०४७ | eoplonar1@gmail.com |
| 6 | मेहकर | श्री संजय चोपडे | ०७२६८-२२४५३९ | ९४२१४९४२६७ | eopmehakar@gmail.com |
| 7 | खामगाव | श्री. पी. आर. वाघ | ०७२६७-२२२०४४ | ९४२०५६१४९६ | eopkhamgaon@gmail.com |
| 8 | शेगाव | श्री. ए. टी. तायडे | ०७२६५-२५२०५२ | ९४२३२३८६९१ | eopshegaon@gmail.com |
| 9 | संग्रामपूर | श्री. समर्थ शेवाळे | ०७२६६-२३२२३३ | ९४२३१६०८१९ | eopsangrampur@gmail.com |
| 10 | जळगाव जामोद | श्री. व्ही. डी. जोशी | ०७२६६-२२१४३७ | ९७६७९३०४६७ | eopjalgaonjamod@gmail.com |
| 11 | नांदूरा | श्री. बी. एस. चरखे | ०७२६५-२२१०१८ | ९४२२७३४९७४ | eopnandura@gmail.com |
| 12 | मलकापूर | श्री. एस. पी. सावळे | ०७२६७-२२२०४४ | ९४२०३३८०७५ | eopmalkapur1@gmail.com |
| 13 | मोताळा | श्री.एम.आर.नाईक | ०७२६७-२४५२३३ | ९८२२४६८२५६ | eopmotala@gmail.com |